# वालचंद अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे अनावरण

जनप्रवास । सांगली

सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय हे अभियांत्रिकी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक मानले जाते. शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा, तांत्रिक क्षेत्रातील नाविन्यपूर्णता आणि समाजासाठी घडवलेले असंख्य यशस्वी अभियंते यामुळे या संस्थेचे स्थान विशेष आहे. या परंपरेला पुढे नेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्‌घाटन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार संजयकाका पाटील यांच्याहस्ते संपन्न झाले. नवीन क्रीडा सुविधा टप्पा एकचे पूर्ण झाले असून यामध्ये विद्यार्थ्यांना पिकलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस व फुटबॉल या खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. टप्पा दोनचे काम लवकरच सुरू होणार आहे.



▌ वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रीडा सुविधा केंद्र उद्‌घाटनप्रसंगी चकोर गांधी, माजी खासदार संजयकाका पाटील, दीपक शिंदे आदी मान्यवर.

महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीवर व खेळाडू वृत्तीच्या जोपासनेवर नेहमीच भर दिला आहे. ज्ञान आणि क्रीडा यांचा संगम साधून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता प्राप्त व्हावी, या उद्देशाने क्रीडा व जिमखाना विभागाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. नव्याने उभारलेल्या सुविधांमध्ये आधुनिक खेळाचे मैदान, अत्याधुनिक उपकरणे, तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली या सर्व क्रीडा सुविधांचा विकास करण्यात आलेला आहे. या उद्घाटन सोहळ्यास ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, दीपकबाबा शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य अमोल चव्हाण, सी. एच. कोटीभास्कर, एम. पी. पारिख, .बजरंग पाटील, उपसंचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच क्रीडा सुविधा विकास सल्लागार फिरदोश श्रॉफ प्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंग राठोड यांनी मान्यवरांचे स्वागत करून या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.



सांगली : वालचंद महाविद्यालयात क्रीडा सुविधांचे उद्घाटन करताना अजित गुलाबचंद, माजी खासदार संजय पाटील, चकोर गांधी, दीपक शिंदे आदी.

# वालचंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्घाटन

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्घाटन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार संजय पाटील यांच्याहस्ते झाले.

नवीन क्रीडा सुविधा टप्पा एकचे काम पूर्ण झाले असून यामध्ये विद्यार्थ्यांना पिकलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस व फुटबॉल या खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. टप्पा दोनचे काम लवकरच सुरू होणार आहे.

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली या सर्व क्रीडा सुविधांचा विकास करण्यात आलेला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, दीपक शिंदे, अमोल चव्हाण, सी. एच. कोटीभास्कर, एम. पी. पारिख, बजरंग पाटील, उपसंचालक प्रा. डॉ. यु. ए. दबडे, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच क्रीडा सुविधा विकास सल्लागार फिरदोश श्रॉफ प्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंग राठोड यांनी मान्यवरांचे स्वागत करून या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.

# ‘वालचंद’मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा

## टप्पा दोनचे काम लवकरच; विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाचा पुढाकार

सांगली, ता. २० : सांगलीतील वालचंद महाविद्यालय हे अभियांत्रिकी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक मानले जाते. शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा, तांत्रिक क्षेत्रातील नावीन्यपूर्णता आणि समाजासाठी घडवलेले असंख्य यशस्वी अभियंते, यामुळे या संस्थेचे स्थान विशेष आहे. या परंपरेला पुढे नेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्घाटन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार संजय पाटील यांच्या हस्ते झाले.

नवीन क्रीडा सुविधा टप्पा एकचे पूर्ण झाले असून यामध्ये विद्यार्थ्यांना पिकलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस व फुटबॉल या खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. टप्पा दोनचे काम लवकरच सुरू होणार आहे.



सांगली : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील क्रीडा सुविधांचा श्रीफळ वाढवून प्रारंभ करताना डॉ. सुरेंद्रसिंग राठोड. शेजारी महाविद्यालयाचे पदाधिकारी.

महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीवर व खिलाडू वृत्तीच्या जोपासनेवर नेहमीच भर दिला आहे. ज्ञान आणि क्रीडा यांचा संगम साधून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता प्राप्त व्हावी, या उद्देशाने क्रीडा व जिमखाना विभागाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. नव्याने उभारलेल्या सुविधांमध्ये आधुनिक क्रीडांगण, अत्याधुनिक उपकरणे, तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे चेअरमन अजित गुलाबचंद यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा सुविधांचा विकास करण्यात आला आहे. उद्घाटन सोहळ्यास ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, दीपक शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य अमोल चव्हाण, सी. एच. कोटीभास्कर, एम. पी. पारिख, बजरंग पाटील, उपसंचालक प्रा. डॉ. यू. ए. दबडे, प्रबंधक डॉ. एस. जी. ताह्मणकर, तसेच क्रीडा सुविधा विकास सल्लागार फिरदोश श्रॉफ प्रमुख उपस्थित होते.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंग राठोड यांनी मान्यवरांचे स्वागत करून या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याला उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातही संधी मिळणार आहे.

# वालचंदमध्ये क्रीडा सुविधांचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात नव्याने उभारलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्घाटन प्रशासकीय परिषदेचे सदस्य, माजी खासदार संजय पाटील यांनी केले. याअंतर्गत विद्यार्थ्यांना पिकलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस व फुटबॉल या खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत. नव्याने उभारलेल्या सुविधांमध्ये क्रीडांगण, अत्याधुनिक उपकरणे तसेच प्रशिक्षणासाठी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. परिषदेचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांच्या मार्गदर्शनाखाली या सुविधा विकसित केल्या आहेते.



सांगलीत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रीडा सुविधांचे उद्घाटन माजी खासदार संजय पाटील यांनी केले.

उद्घाटनावेळी चकोर गांधी, दीपक शिंदे-म्हैसाळकर, अमोल चव्हाण, सी. एच. कोटीभास्कर, एम. पी. पारिख, बजरंग पाटील, उपसंचालक प्रा. डॉ. यू. ए. दबडे, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच फिरदोश श्रॉफ उपस्थित होते. डॉ. सुरेंद्रसिंग राठोड स्वागत केले.

# वालचंद महाविद्यालयात क्रीडा सुविधांचे अनावरण

प्रतिनिधी

सांगली


सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय हे अभियांत्रिकी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक मानले जाते. शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा, तांत्रिक क्षेत्रातील नाविन्यपूर्णता आणि समाजासाठी घडवलेले असंख्य यशस्वी अभियंते यामुळे या संस्थेचे स्थान विशेष आहे. या परंपरेला पुढे नेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधांचे उद्घाटन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार संजयकाका पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

नवीन क्रीडा सुविधा टप्पा एकचे पूर्ण झाले असून यामध्ये विद्यार्थ्यांना पिकलबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेनिस व फुटबॉल या खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. टप्पा दोनचे काम लवकरच सुरू होणार आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीवर व खेळाडू वृत्तीच्या जोपासनेवर नेहमीच भर दिला आहे. ज्ञान आणि क्रीडा यांचा संगम साधून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता प्राप्त व्हावी, या उद्देशाने क्रीडा व जिमखाना विभागाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.



नव्याने उभारलेल्या सुविधांमध्ये आधुनिक खेळाचे मैदान, अत्याधुनिक उपकरणे, तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अजित गुलाबचंद यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली या सर्व क्रीडा सुविधांचा विकास करण्यात आलेला आहे. या उद्घाटन सोहळ्यास ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य चकोर गांधी, दीपकबाबा शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य श्री अमोल चव्हाण, सी.एच.कोटीभास्कर, एम. पी. पारिख, बजरंग पाटील, उपसंचालक प्रा.डॉ.यु.ए.दबडे, प्रबंधक डॉ. एस. जी. ताम्हणकर तसेच क्रीडा सुविधा विकास सल्लागार फिरदोश श्रॉफ प्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेंद्रसिंग राठोड यांनी मान्यवरांचे स्वागत करून या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.




सांगली : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संघास द्वितीय पारितोषिक प्रदान करताना मान्यवर.

# भारत नवनिर्माण चॅलेंज स्पर्धेत 'वालचंद'चे यश

**सांगली :** येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संघाने 'भारत नव-निर्माण चॅलेंज' स्पर्धेच्या पुणे सिटी फिनालेमध्ये द्वितीय पारितोषिक (फर्स्ट रनर अप) प्राप्त केले. 'एनआयसीएमएआर' आणि 'एआयसीटीई' यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या संघामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभागातून तृतीय वर्षाचे विद्यार्थी प्रणव पाटील व आदित्य राऊत आणि यांत्रिक अभियांत्रिकी विभागातून तृतीय वर्षाचा विद्यार्थी समर्थ गायकवाड सहभागी झाले. या स्पर्धेत या टीमने यश संपादित करून हा संघ स्पर्धेच्या पुढील टप्प्यामध्ये अर्थात 'रिजनल फिनाले'मध्ये सहभागी होण्यासाठी पात्र झाला आहे. पात्र विद्यार्थ्यांचे वालचंद महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले.

# ‘वालचंद’चा शनिवारी पुण्यात माजी विद्यार्थी मेळावा

## श्रीनिवास पाटील : जागतिक स्तरावरील उद्योजक-शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. २५ : येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांसाठी शनिवारी (ता. २८) जागतिक माजी विद्यार्थी व्यापार मेळावा-२०२६ चे आयोजन करण्यात येत आहे. पुण्यातील ‘टिप टॉप इंटरनॅशनल’ येथे दुपारी २ ते रात्री १० पर्यंत हा कार्यक्रम होणार आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, उद्योगातील दिग्गज, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांना एका व्यासपीठावर आणण्याच्या उद्देशाने हा मेळावा होणार असून यानिमित्ताने उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात समन्वय आणि संवादाचा पूल तयार व्हावा, असा प्रयत्न असल्याचे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील यांनी सांगितले. यावेळी निवडक माजी विद्यार्थ्यांचा वालचंद गौरव पुरस्काराने गौरव होणार आहे.




दुपारी अडीच वाजता नोंदणी सुरू होईल. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रशासकीय परिषदेचे सदस्य अमोल चव्हाण यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. दुपारी सव्वातीन वाजता ‘को-रोव्हर’चे संस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील तज्ज्ञ अंकुश सबरवाल यांचे ‘लीडिंग व्हॉइस’ सत्र होईल. त्यानंतरचे चर्चासत्र ‘आधुनिक वेब आणि माहिती- तंत्रज्ञान क्षेत्राचे भविष्य’ विषयावर होईल. मुख्य पाहुणे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अभय जेरे यांचे मार्गदर्शन होईल. त्यात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा सहभाग आहे. सायंकाळी पाच वाजता ‘समस्या निवारण’ गोलमेज परिषदेद्वारे सध्याच्या व्यावसायिक समस्यांवर चर्चा होईल.

नवउद्यमी प्रदर्शन भरणार असून सायंकाळी सव्वासहा वाजता महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण योजना प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे. प्रशासकीय परिषदेचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होत असून सदस्य चकोर गांधी, अमोल चव्हाण, संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड आदींची प्रमुख उपस्थिती आहे. माजी विद्यार्थी समन्वय विभागाच्या अधीष्ठाता डॉ. मेधा शाह, प्रा. नारायण मराठे समन्वयक आहेत. अधिक माहितीसाठी walchandsangli.ac.in संकेतस्थळास भेट द्यावी.

# ‘वालचंद अभियांत्रिकी’मध्ये २०४७ च्या व्हिजनवर मंथन

## ग्लोबल बिझनेस मीट : सांगलीत डेटा सेंटर उभारण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

■ सकाळ वृत्तसेवा




पुणे : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या ‘ग्लोबल अ‍ॅल्युमनी बिझनेस मीट’मध्ये सहभागी डॉ. अभय जेरे, चकोर गांधी, अमोल चव्हाण, डॉ. मेधा शाह, अंकुश सभरवाल, दीपक शिंदे आदी.

सांगली, ता. १ : तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची ‘ग्लोबल अ‍ॅल्युमनी बिझनेस मीट-२०२६’ पुण्यात दिमाखात झाली. मेळाव्यात एआयचे वाढते महत्त्व, आयटी सेवांचे भविष्य, तंत्रज्ञान क्षेत्रातील वाटचाल, २०४७ चे व्हिजन यावर मंथन करण्यात आले.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी उपाध्यक्ष आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे मुख्य नवोपक्रम अधिकारी डॉ. अभय जेरे, अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिल सदस्य चकोर गांधी प्रमुख उपस्थित होते. अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलचे सदस्य अमोल चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. ‘कोरोव्हर डॉट एआय’चे संस्थापक अंकुश सभरवाल यांच्याशी सचिन केळकर यांनी संवाद साधला. त्यातून ‘कन्व्हर्सेशनल एआय’च्या भविष्यावर प्रकाश टाकण्यात आला.

मिलिंद नेने यांनी ‘एजेंटिक वेब आणि आयटी सेवांचे भविष्य’ या विषयावरील परिसंवादाचे सूत्रसंचालन केले. डॉ. प्रशांत पानसरे आणि नीलेश बिनीवाले यांनी सहभाग घेतला. कृत्रिम बुद्धिमत्ता ही सर्वांसाठी असून ‘एआय’च्या वापरामध्ये नैतिकता ही कायद्याच्याही वर असल्याचे स्पष्ट केले. ऋषी ओबेरॉय यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या राउंडटेबल चर्चेत शिक्षणावरील ‘एआय’चा प्रभाव आणि ‘इंडिया एनर्जी स्टॅक’ यावर ऊहापोह झाला.

पॅटर्न, अनुभूती सोल्युशन्स, ‘टीटीबाय-३’, ‘इनोश्री’, ‘ड्युरोल्ट’, ‘फॅदमग्राफ’, ‘कोरेको टेक्नॉलॉजीज’ आणि ‘भारत रॅपियर लूम’ यांसारख्या माजी विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप्सनी सादरीकरण केले. माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष अरविंद देशपांडे, व्यवस्थापन सदस्य दीपक शिंदे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अभय जेरे यांनी माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचे ‘थिंक टँक’ तयार करून ‘रोडमॅप’ बनवावा, असे सुचवले. ‘एआय’च्या काळात विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता टिकवण्यासाठी समीक्षात्मक विचार, सहयोग, संवाद, कल्पकता महत्त्वाचे असल्याचे सांगितले. डीन प्रा. डॉ. मेधा शाह यांनी नवीन ‘वालचंदप्रो’ या ऑनलाइन कौशल्यवृद्धी व्यासपीठाची माहिती दिली. प्रा. नारायण मराठे, डॉ. सोलापुरे, प्रा. पावडे यांनी नियोजन केले. उपसंचालक प्रा. डॉ. उदय दबडे यांनी आभार मानले.

### सांगलीत डेटा सेंटर

■ महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. सुरेंद्र राठोड यांनी ‘वालचंद’च्या भविष्यातील योजनांची माहिती दिली. जिल्हाधिकारी अशोक काकडे यांचा विशेष व्हिडिओ संदेश दाखवण्यात आला. सांगलीच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढे येऊन एक अद्ययावत डेटा सेंटर उभारावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. त्यासाठी शासन सर्व सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### वालचंद गौरव पुरस्कार प्रदान

या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील योगदानाबद्दल दिग्गजांचा सन्मान करण्यात आला. डॉ. विजय बापट (शिक्षण क्षेत्र), एकनाथ पाटील (सार्वजनिक सेवा), उल्हास कौलगुटकर (इन्फ्रास्ट्रक्चर), हरी कुलकर्णी (माजी प्राध्यापक प्रवर्ग), डॉ. सदानंद जोशी (उद्योग क्षेत्र) यांचा गौरव करण्यात आला.


## तंत्र मंत्र



■ डॉ.ए.जे. उंबरकर
अधिष्ठाता, संशोधन आणि विकास
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली

# 'एआय' वापरासाठी शहाणपण हवे

**आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग (ML) ही केवळ तांत्रिक परिभाषापुरती मर्यादित न राहता आपल्या शाळा, महाविद्यालये, संशोधन प्रयोगशाळा आणि गृहपाठामध्येही मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. शिकण्याच्या एकूण प्रक्रियेतील मोठा भाग हे तंत्र व्यापत आहे, अशावेळी AI चा वापर थांबविणे हा उपाय नसून, याबाबत शहाणपणाने, स्पष्ट नियमांसह आणि नैतिकतेच्या चौकटीत वापर करणे हा खरा उपाय आहे.**



शिक्षणाची आत्मा मानवी आहे आणि ती कायम राखली पाहिजे. AI शिक्षकाला पर्याय नाही. त्याचा संतुलित वापर हवा. ही शैक्षणिक क्षेत्रासोबत भागीदारी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि समजुतीच्या पायावर आधारित असेल. अशा धोरणांच्या दिशेने शिक्षण क्षेत्राने तातडीने पाऊले टाकली पाहिजेत.

सध्या अनेक स्तरांवर AI चा वापर प्रभावीपणे होत आहे. जसे की, ChatGPT (Study Mode): संकल्पना स्पष्ट करणे आणि क्विझद्वारे सक्रिय शिक्षणासाठी उपयुक्त. Perplexity & Consensus: ही साधने उत्तरासोबतच मूळ वैज्ञानिक संदर्भ आणि शोधनिबंधांचे पुरावे देतात, जे संशोधकांसाठी मोलाचे ठरतात. Paperpal & SciSpace: लेखनातील व्याकरण सुधारणे, जटिल शोधनिबंधांचे सुलभीकरण करणे आणि गणितीय संज्ञा स्पष्ट करण्यासाठी ही साधने वापरली जात आहेत. यामुळे शिक्षण अधिक वेगवान, वैयक्तिक आणि कार्यक्षम झाले आहे. शिक्षकांचा वेळ वाचतोय, तर विद्यार्थ्यांना त्यांच्या गतीनुसार शिकण्याची संधी मिळत आहे.

### संभाव्य धोके आणि आव्हाने

फायद्यांसोबतच AI मुळे काही गंभीर धोकेही निर्माण झाले आहेत. सर्वांत मोठी भीती ''अतिनिर्भरतेची'' आहे. जर विद्यार्थी प्रत्येक गोष्टीसाठी AI वर अवलंबून राहिले, तर त्यांची स्वतंत्र विचारशक्ती आणि सर्जनशीलता नष्ट होऊ शकते. तसेच AI नेहमीच अचूक असते असे नाही; अनेकदा त्यात जुना किंवा पक्षपाती डेटा असू शकतो, ज्यामुळे चुकीची माहिती पसरण्याचा धोका असतो. याशिवाय, ''प्लेजरिझम'' (साहित्यिक चोरी) आणि बनावट डेटा वापरून प्रबंध तयार करणे यांसारख्या अनैतिक गोष्टीही वाढू शकतात.

### हवी स्पष्टता.

एआय निर्मित आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेने स्वतःचे AI धोरण आखणे गरजेचे आहे. त्यासाठी काही मुद्यांबाबत स्पष्टता हवी.

### मर्यादा निश्चिती

व्याकरण सुधारण्यासाठी AI चा वापर ठीक आहे, पण पूर्ण निबंध किंवा शोधनिबंध तयार करणे चुकीचे ठरवले जावे.

### पारदर्शकता

विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी AI चा वापर केला असल्यास, तसा स्पष्ट उल्लेख किंवा ''डिस्क्लेमर'' देणे अनिवार्य असावे. ज्यातून आपल्या एकूण अध्यापन व्यवहारात पारदर्शकता आली पाहिजे. तसे मानस विद्यार्थ्यांचे घडले पाहिजे.

### नैतिक शिक्षण

शाळांनी विद्यार्थ्यांना AI चा जबाबदार वापर कसा करावा, याचे तंत्रशुद्ध शिक्षण दिले पाहिजे. जरी GPTZero किंवा Turnitin सारखी साधने AI मजकूर ओळखण्यासाठी उपलब्ध असली, तरी ती १०० टक्के अचूक नाहीत. त्यामुळे मानवी विवेकबुद्धी आणि स्पष्ट नियमावली यांचा समन्वय साधणेच हिताचे आहे.

शेवटी AI हे भविष्यातील अपरिहार्य तंत्रज्ञान आहे. योग्य धोरणांच्या चौकटीत राहून त्याचा वापर केल्यास शिक्षणाची गुणवत्ता वाढेल; अन्यथा, पारदर्शकता आणि नैतिकतेला धक्का लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज 'एआय' प्राथमिक अवस्थेत आहे. त्याचे पूर्ण स्वरूप पुढे येण्यास कालावधी लागेल. या काळात आपल्याला आपल्या शैक्षणिक धोरणातही त्यानुसार बदल करावे लागतील. शेवटी एआय ही मानवी बुध्दीची निर्मिती आहे याचे भान हरवता उपयोगाचा नाही. शिक्षणाचा तोच अंतिम हेतू आहे. याबाबत 'वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्पष्ट पाऊले टाकली आहेत.

(पुर्वार्ध)